# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल
### २०१६-१७

शैक्षणिक सत्र २०१६–१७ च्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये सहभागी होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची नामांकन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण व्हावी. श्रमदानाची भावना जोपासावी, सेवाभाव निर्माण व्हावा, श्रमाची प्रतिष्ठा निर्माण व्हावी तसेच ग्रामीण जीवनाशी त्यांचा परिचय होऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजनेबद्दलची माहिती अशा विविध पैलुंशी स्वयंसेवकांना परिचीत करण्यात आले. विविध माध्यमाद्वारे त्यांना याबाबत प्रेरणा देण्यात आली.

## दि. २१ जून २०१६

आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्य राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे स्वयंसेवकांना योग कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात आले. या योग प्रशिक्षण कार्यक्रमात योग गुरू श्री.रतन पूरस्वानी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते.

## दि. १ जुलै २०१६

महाराष्ट्र राज्य सरकारकडून २ कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यात आला. त्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना पथकाकडून महाविद्यालयाच्या परिसरात १०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. रमेशपंत मामीडवार, सचिव मा. प्रशांत पोटदुखे, सहसचिव मा. डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी.इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते.

## दि. ६ ऑगष्ट २०१६

'स्वच्छ भारत' पंधरवाडयाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छतेविषयी महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## दि. ८ ऑगष्ट २०१६

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी यादृष्टीने विविध प्रकारची स्वच्छता या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक गौरव उपरे, द्वितीय क्रमांक संघवी बोमीडवार तर तृतीय क्रमांक मोनीका कलवल हीने प्राप्त केला. वक्तृत्व स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. सूनिता बन्सोड आणि डॉ. सपना बेगीनवार यांनी काम केले.

## दि. ९ ऑगष्ट २०१६

ग्रामस्वच्छता राष्ट्रीय सेवा योजना पथकाने घेतलेले दत्तक गांव विसापूर येथे अधिकारी वर्ग आणि स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता अभियान राबविला.

## दि. १० ऑगष्ट २०१६

विद्यार्थ्यांना आरोग्य म्हणजे काय, सुदृढ आरोग्याने व्यक्तिगत स्वच्छतेचे आणि सामुहिक स्वच्छतेचे काय महत्व आहे. याची जाणीव जागृती होण्याच्या दृष्टीने डॉ. वृषाली बोंदगुलवार, स्त्रीरोग तज्ञ चंद्रपूर यांनी 'आरोग्याची गुरूकिल्ली–स्वच्छता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## दि. ११ ऑगष्ट २०१६

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी, या हेतूने 'स्वच्छता काळाची गरज'' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले स्पर्धेचे मूल्यांकन प्रा. शाम हेडाऊ यांनी केले. यामध्ये प्रथम क्रमांक रमाकांत चव्हाण, द्वितीय क्रमांक रिना एकनाथ चौधरी हिने तर तृतीय क्रमांक पूजा धूरंधार प्रसाद हिने पटकाविला.

## दि. १२ ऑगष्ट २०१६

आंतरराष्ट्रीय यूवक दिनाचे औचित्य साधून यूवकांमध्ये स्वत:चे कर्तव्य आणि जबाबदारी काय आहे. राष्ट्र निर्मीतीमध्ये आपली काय भूमीका असणार आहे याची माहिती व्हावी यादृष्टीने ''भावनीक बुद्धी, प्रेरणा आणि युवक'' या विषयावर सुशिलाबाई रामचंद्र मामीडवार समाजकार्य महाविद्यालय, पडोली येथील प्रा. डॉ. पुरूषोत्तम बोरकर यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## दि. १३ ऑगष्ट २०१६

'स्वच्छतेचे जीवनातील महत्व' या विषयावर घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सुशिला बाबूराव प्रथम वर्ष, द्वितीय क्रमांक वैष्णवी वानखेडे तर तृतीय क्रमांक शुभांगी मदन पावडे, बि.ए. प्रथम वर्ष हिने पटकावला.

## दि. १४ ऑगष्ट २०१६

महाविद्यालयीन परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला आणि स्वातंत्र्य दिनाचे निमित्त साधून सर्व परिसर येणाऱ्या १५ ऑगष्ट करीता स्वच्छ केले.

## दि. १५ ऑगष्ट २०१६

स्वतंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाने स्वच्छ भारत पंधरवाडा अभियानाचा समारोप तिरंगा रॅलीने करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, पदव्युत्तर विभागाचे समन्वयक डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य जयश्री धांदे, क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. विजय सोमकुंवर, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी (मुले) प्रा. कुलदीप गौंड, राष्ट्रीय सेवा अधिकारी (मुली) प्रा.उषा खंडाळे, सहाय्यक अधिकारी प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयू पोतनुरवार, शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## दि. १५ ऑगष्ट २०१६ तिरंगा मार्च रॅली

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून चंद्रपूर शहरामध्ये काढण्यात आलेल्या तिरंगा मार्च रॅलीमध्ये सरदार पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला.

## दि. १६ ऑगष्ट २०१६

'स्वच्छता पखवाडा' च्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छते विषयीचे महत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर.पी.इंगोले यांचे अध्यक्षतेखाली स्वयंसेवकांनी स्वच्छतेची शपथ घेतली.

## दि. १७ व १८ ऑगष्ट २०१६

महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो चे अधिकारी व स्वयंसेवक यांनी महाविद्यालयीन परिसर स्वच्छतेचे कार्य हाती घेवून दोन दिवसात पुर्ण केले.

## दि. १९, २० व २१ ऑगष्ट २०१६

राष्ट्रीय सेवा योजना पथकाने घेतलेले दत्तक गांव विसापूर येथे दि. १९ ऑगष्ट २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे अधिकारी वर्ग आणि विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता कार्यक्रमात सहभाग घेतला

## दि. ३० ऑगष्ट २०१६

### अवयव दान रॅली

महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित अवयवदान अभियानाअंतर्गत शहरातून निघालेल्या रॅलीमध्ये रासेयोच्या स्वयंसेवक व अधिकारी यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि २९ ते ३१ ऑगष्ट या दरम्यान झालेल्या विविध स्पर्धेत (निंबंध, रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व) सक्रीय सहभाग घेतला.

## दि. ३१ ऑगष्ट २०१६

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यासोबत सभा आयोजित करण्यात आली. त्या सभेमध्ये भविष्यात महाविद्यालय तसेच महाविद्यालयीन परिसर स्वच्छ ठेवण्याच्या हेतूने विविध उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

## दि. १ सप्टेंबर २०१६ ते १५ सप्टेबर २०१६

### 'स्वच्छ भारत' अभियान

'स्वच्छ भारत' अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छतेचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले व प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करून अभियानातील उपक्रमांची जबाबदारी समितीकडे सोपविली.

## दि. ६ सप्टेंबर २०१६

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी या दृष्टीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांकडून स्वच्छते विषयी शपथ घेण्यात आली.

## दि. ८ ते १० सप्टेंबर २०१६

स्वच्छता अभियानाअंतर्गत राबविण्यात येवून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसर स्वच्छ केले. यात कार्यक्रम अधिकारी व २०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

## दि. १२ सप्टेंबर २०१६

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव जागृती निर्माण व्हावी, या हेतूने 'स्वच्छता काळाची गरज'' या विषयावर डॉ. सुनिल साकुरे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छतेविषयीचे महत्व पटवून दिले.

## दि. १९ सप्टेंबर २०१६

विद्यार्थ्यांपर्यंत स्वच्छतेचा संदेश पोहचविण्याकरीता पालक सभेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी मार्गदर्शन केले.

## दि. २४ सप्टेंबर २०१६

### राष्ट्रीय सेवा योजना स्थापना

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून एस.आर.एम. समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. साकुरे हे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना प्राचार्य साकुरे म्हणाले की, रासेयो द्वारे स्वयंसेवकांनी सामाजिक बांधीलकी जोपासून राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावावा, असे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. स्वयंसेवक व मान्यवरांनी शपथ घेतली.

## दि. २६ नोव्हेंबर २०१६

### संविधान दिन

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, विज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. व्ही. एस. वाढई, कनिष्ठ महाविद्यालयाच्यो उपप्राचार्या जयश्री धांदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, सहाय्यक डॉ. शरयु पोतनुरवार, प्रा. राजकुमार बिरादार आणि स्वयंसेवक उपस्थित होते. संविधान दिना बद्दल मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. इंगोले म्हणाले की, संविधान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या देशाला दिलेली ही अनमोल देन आहे. ज्याद्वारे आपण सर्व लोक आपआपले कर्तव्य आणि अधिकाराची जाण ठेवून प्रगती साध्य करीत आहोत.

## दि. 30 नोव्हेंबर 2016

### "बेटी बचाओ-बेटी पढाओ"

समाजाचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलून त्यांना सन्मानाची वागणुक मिळावी स्त्रि–पुरूष समानता यावी, स्त्री भृणहत्येच्या वाढत्या प्रमाणाला आळा बसावा आणि स्त्री–पुरूष प्रमाण संतुलित रहावे या दृष्टीकोणातून आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आले यामध्ये रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच "बेटी बचाओ–बेटी

पढाओ — एक सामाजिक बांधिलकी" या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

याकरिता परिक्षक म्हणून प्रा. शाम हेडावू, डॉ. विद्याधर बन्सोड यांची नियुक्ती करण्यात आली.

यात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक गौरव उपरे तर द्वितीय क्रमांक कल्याणी बल्की व तृतीय क्रमांक राजश्री कालीवाले यांनी पटकाविला.

या स्पर्धामध्ये १०० स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

## दि. २३ डिसेंबर २०१६

## वित्तीय साक्षरता अभियान

सर्वोदय शिक्षण मंडळ संचालित सरदार पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दि. २३ डिसेंबर २०१६ रोजी वित्तीय साक्षरता अभियाना अंतर्गत — एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताने पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी नोट बंदीची घोषणा केल्यानंतर सामान्य व्यवहार विस्कळीत झाले. जनता कॅशलेस आणि कॅश फ्री याबाबत अनाभिज्ञ असल्यामुळे आर्थिक व्यवहार करण्यात अनेक अडचणी येवू लागल्या. लोकांचे ए.टी.एम., पे.टी.एम., क्रडिट कार्ड, डेबीट कार्ड याविषयी असलेल्या गैर समजुती तसेच भ्रम, त्याचप्रमाणे कॅशलेस म्हणजे काय? आणि कॅश फ्री म्हणजे नेमके काय? दोघांमधील फरक आणि एकुण या सर्वांबद्दल जनतेमध्ये जाणिव जागृत करणे आणि वित्तीय साक्षरतेचा प्रचार आणि प्रसार करणे हे ध्येय डोळयासमोर ठेवून शासनाने परिपत्रक काढले कार्यक्रमाचे आयोजन करून यात १० विद्यार्थ्यांची निवड करून दत्तक गावामध्ये त्या विद्यार्थ्यांद्वारे घरोघरी जाऊन वित्तीय साक्षरता अभियान राबविले. कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक बँक ऑफ महाराष्ट्र चंद्रपूरचे व्यवस्थापक श्री. शंकर आनंद व त्यांचे सहकारी श्री. अग्रवाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. उषा खंडाळे (मुली), राष्ट्रीय सेवा योजनेचें प्रा. कुलदीप गौंड (मुले), प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयू पोतनुरवार, सहाय्यक अधिकारी स्वयंसेवक उपस्थित होते.त्यात डॉ. आर. पी.इंगोले यांनी विद्यार्थ्यांनी वित्तीय साक्षरतेचे ज्ञान आत्मसात करून त्याचा फायदा दत्तक गाव विसापूर येथील नागरीकांना वित्तीय साक्षरतेबाबत जाणीव करणे आणि त्यांना साक्षर बनविण्याकरिता करावा असे आवाहन केले.

उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे वित्तीय साक्षरतेचे आणि भ्रष्टाचार निर्मुलनाचे स्वप्न एक समाजाचा घटक आणि चांगला स्वयंसेवक म्हणून राष्ट्रीय सेवा योजनाच्या विद्यार्थ्यांनी ही मोहीम राबवून पुर्ण करावे असे मत व्यक्त केले. प्रमुख वक्ते शंकर आनंद यांनी विद्यार्थ्यांना कॅशलेस आणि कॅश फ्री यामधील फरक काय आहे, कॅशलेसचे फायदे कोणते, त्याचबरोबर कफशलेसच्या अनेक पद्धतींचे सखोल ज्ञान मौखिक आणि पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशनद्वारे दिले स्वत: याचे ज्ञान घेऊन स्वत:पासून सुरूवात करून कुटुंब, समाज, गाव, पर्यायाने संपुर्ण भारत कॅशलेस आणि वित्तीय साक्षर बनविण्याची क्षमता तुमच्यासारख्या तरूणांमध्ये आहे. ते तुम्ही सहज करू शकता असा आशावाद व्यक्त केला.

## दि. १२ जानेवारी २०१७
## आपत्ती-व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

सरदार पटेल महाविद्यालयात शारिरीक शिक्षण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गोंडवाना विद्यापीठ द्वारा आयोजित "आपत्ती—व्यवस्थापन प्रशिक्षण" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन गुरूवार दि. १२ जानेवारी २०१७ रोजी सकाळी १०.०० वा. शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजली हस्तक यांचे शुभहस्ते पार पडले. उद्घाटन प्रसंगी डॉ. अंजली हस्तक म्हणाल्या की कोणतीही नैसर्गीक आपत्ती येण्या अगोदर त्यावर नियंत्रण ठेवण्याकरीता व स्वसंरक्षण व इतरांच्या रक्षणाकरीता प्रशिक्षण घेणे अतिशय गरजेचे आहे. त्याकरिता निमंत्रित प्रशिक्षक हे प्रशिक्षण देण्याकरिता आले आहेत. त्यांच्या कडून विद्यार्थ्यांनी प्रशिक्षा घ्यावे व समाजात त्याचा प्रसार करावा की जेणेकरून समाजातील व्यक्तींना सुद्धा प्रशिक्षणाचा लाभ होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, निसर्गापासून मिळणारे स्त्रोत जल, हवा व प्रकाश हे मानवी जीवनात अत्यंत आवश्यक आहेत. जर या स्त्रोतापासून नैसर्गिक आपत्ती आली तर मानवी जीवनात कलह निर्माण होतो म्हणून यापासून आपली सूटका कशी व्हावी व इतरांची सुद्धा सुटका कशी करावी याकरिता आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण घेणे अतिशय गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी तज्ञांकडून योग्य प्रशिक्षण घ्यावे. समाजात त्याचा प्रचार करावा जेणेकरून समाजाला त्याचा फायदा होईल आपत्ती व्यवथापन कार्यशाळेत आलेले तज्ञ श्री. सुनिल नागतोडे, श्री. देवेशकुमार प्रसाद, श्री. शरद बनकर, श्री. विजय मोरे, श्री. अनिल चव्हाण यांनी दृश्य पटलावर तसेच विद्यार्थ्यांना सोबत घेऊन पूर, अग्नि व वादळे या नैसर्गिक आपत्ती पासून बचाव कशाप्रकारे करावा व इतरांचे संरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ते करून बघितले. दिवसभरात एकूण चार सत्रात तज्ञांनी प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेत विविध महाविद्यालयाच्या एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार यांनी औद्योगीक व रासायनिक दुर्घटना व प्रथमोपचार यावर प्रकाश टाकला तर प्रमुख अतिथी आई.एम.एस.आर. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयेश चक्रवर्ती यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, नैसर्गिक आपत्ती पासून सुटका व्हावी याकरिता अगोदर व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे.

## दि. ४ फेब्रुवारी २०१७
## विद्यापीठस्तरीय व महाविद्यालयीन विशेष शिबिर उद्घाटन कार्यक्रम

सरदार पटेल महाविद्यालयाच्या वतीने गोंडवाना विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराचे आयोजन शनिवार दि. ४ फेब्रुवारी २०१७ ते शुक्रवार दि. १० फेब्रुवारी २०१७ या कालावधीत घेण्यात येत आहे.या शिबिराचा मुख्य विषय "स्वच्छ आणि रोखरहित भारत" आहे. या शिबिरात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयातील १०० तसेच

महाविद्यालयीन विशेष शिबिरात १०० असे एकुण २०० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. याचा उद्घाटन सोहळा थाटात पार पडला. त्याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजली हस्तक, उद्घाटक डॉ. श्रीराम रोकडे, विसापूरचे सरपंचा सौ. रिताताई जिलटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, श्री. अशोक थेरे, श्री. विजय वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. अंजली हस्तक यांनी स्वयंसेवकांना स्वच्छता विषयी मार्गदर्शन करतांना "आपण ज्या परिसरात राहतो तो परिसर स्वच्छ असावाच त्याच बरोबर प्रत्येक व्यक्तीचे मनदेखील स्वच्छ असावेत" असे मत मांडले, तसेच आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी जनतेनी रोखरहित व्यवहारावर भर द्यावा यासाठी स्वयंसेवकांनी कार्य करावे असे मत व्यक्त केले.

उद्घाटक डॉ. श्रीराम रोकडे यांनी व्यसनाधिनता, वृद्धाच्या समस्या, विद्यार्थ्यांच्या समस्या, भ्रष्टाचार, मोबाईलचा दुरूपयोग इत्यादी समस्यांवर आपल्या जीवनात आलेल्या अनुभवाच्या कथनातून मनोरंजक शैलीद्वारे मार्गदर्शन केले. तसेच स्वयंसेवकांनी व्यसनाधिनतेपासून दुर राहण्याची शपथ घेतली.

विसापूरच्या सरपंचा सौ. रिताताई जिलटे यांनी आपल्या मनोगतात मागील वर्षाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. तसेच स्वयंसेवकांना विसापूरच्या समस्याचा परिचय करून दिला व स्वयंसेवकांनी केलेल्या जनजागृती कार्यक्रमामुळे समस्येची तिव्रता कमी होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी आपल्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनात नॅक समिती, बंगलुर यांनी महाविद्यालयाचे मुल्यांकन केले त्यात महाविद्यालयाला नॅकद्वारे 'अ' दर्जाचे मुल्यांकन प्राप्त झाले. त्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे केलेल्या कार्याची चर्चा करण्यात आली. नॅक समितीने दत्तक गाव विसापूर येथे प्रत्यक्ष भेट दिली होती. त्यांनी स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत नेण्याचा स्वयंसेवकांना आग्रह केला. शिबिर कालावधीत रोखरहित व्यवहार कार्यशाळेत स्वयंसेवकांनी प्रशिक्षीत होऊन गावातील लोकांना प्रशिक्षण द्यावे तसेच रोखरहित व्यवहार केल्याने होणाऱ्या फायद्याविषयी मार्गदर्शन केले.

## दि. ५ व ६ फरवरी २०१७

या दोन दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विसापूर गावातील जनतेला पाणी पूरवठा होण्याचे दृष्टीने दोन दिवस ८० ते ९० मीटर बंधारा बांधण्याचे काम विद्यार्थ्यांनी पुर्ण केले. या बंधाऱ्यामुळे वर्धा नदीच्या पाण्याचा प्रवाह गावाच्या दिशेने वळविता त्यामुळे गावातील बोरवेल व विहिरीतील पाण्याची पातळी वाढल्या मुळे विसापूर गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येची तिव्रता कमी झाली.

## दि. ७ फरवरी २०१७

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दि. ७ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ११.०० वा. जिल्हा रूग्णालय, चंद्रपूर येथील चमू बोलविण्यात येऊन त्या चमूने विद्यार्थ्यांकरीता "हिमोग्लोबीन व शुगर चाचणी शिबिर" घेण्यात आले. तसेच दुपारी २.०० वा. डॉ. योगेश दुधपचारे, जनता महाविद्यालयाचे भूगोल विभाग प्रमुख यांनी स्वच्छतेविषयी ची माहिती विद्यार्थ्यांना पटवून दिली. दुपारी ३.३० वा डॉ. मंगेश गुलवाडे हे "मद्यपान, तंबाखु आणि मादकद्रव्य मुक्त समाज" या विषयावरील

मार्गदर्शन करण्याकरीता उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप गोंड अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यानंतर सायंकाळी ७.०० वा. सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

## दि. ८ फरवरी २०१७

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दि. ८ फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी २.०० वा. कार्यशाळा घेण्यात आली त्यात डॉ. दिलीप बारसागडे, समाजकार्य महाविद्यालय, गडचिरोली यांनी "वित्तीय साक्षरता" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजने च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे यांनी अध्यक्षीयस्थानी उपस्थित होत्या. त्यानंतर सायंकाळी सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

## दि. ९ फरवरी २०१७

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दि. ९ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ९.०० वा. जिल्हा रूग्णालय, चंद्रपूर यांनी "सिकलसेल चाचणी शिबिर" घेतले. या चाचणी मध्ये शिबिरातील ०६ विद्यार्थी आढळून आले त्यांना पुढील उपचाराकरीता जिल्हा सामान्य रूग्णालयात पाठविण्यात आले. त्याचवेळी दुपारी २.०० वा. प्रा. शाम धोपटे यांनी "व्यक्तिमत्व विकास" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार यांनी अध्यक्षीयस्थान स्विकारले त्यानंतर दुपारी ३.०० वा. सर्व स्वयंसेवकांनी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, प्रा. शाम धोपटे, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कार्यक्रम अधिकारी यांनी वृद्धाश्रमाला भेट दिली त्यात त्यांनी स्वयंसेवकांच्या हाताने वृद्धांना फळवाटप करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

## दि. १० फरवरी २०१७

## समारोपीय कार्यक्रम

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दि. १० फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ११.०० वा. अवयव दान या विषयावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चमू ने मार्गदर्शन करून अवयव दानाचे अर्ज भरून घेतले त्यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी अर्ज भरून दिले. राष्ट्रीय सेवा योजनेचा समारोपीय कार्यक्रम दुपारी १२.०० वा. सुरू करण्यात आला. त्यात राष्ट्रीय सेवायोजना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे समन्वयक डॉ. नरेश मडावी यांनी स्वयंसेवकांनी बांधलेला बंधारा व गावातील स्वच्छते विषयी केलेल्या कार्याचा गौरव केला, विसापूरचे उपसरपंच श्री. सुनिल रोंगे शिबिरार्थ्यांनी केलेल्या श्रमसंस्काराच्या माध्यमातून वर्धानदीवर बांधलेल्या मातीच्या बंधाऱ्या मुळे विसापूर गावच्या पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्रतेने कमी झाली. याबद्दल सर्वांचे कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी रोखरहीत व्यवहारामुळे समाजाला होणारे फायदे यावर मार्गदर्शन करून प्राचार्य डॉ. जयेश चक्रवर्ती म्हणाले की आपल्या देशातील वृद्धाश्रमाची संख्या कमी व्हावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून कार्य केले जावे असे मत व्यक्त केले. राष्ट्रीय शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप जयस्वाल यांनी समाजातील युवकांकडून होणारा नियमबाह्य वर्तनाबद्दल चिंता व्यक्त केली. व अनुशासनाचे धडे स्वयंसेवकांनी समाजापर्यंत नेले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे, प्रा. कुलदीप गौंड, सहाय्यक अधिकारी डॉ. सौ. शरयु पोतनुरवार, प्रा.

राजकुमार बिरादार, रासेयो शिबिरातील सर्व विद्यार्थी तसेच शिबिरात उपस्थित शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद यांच्या उपस्थितीत समारोपीय कार्यक्रम पार पडला.

## दि. ३ फरवरी २०१७

## सायकल रॅली

इंधन व पर्यावरण समस्येच्या जनजागरण करण्याकरिता "इंधन संरक्षण की जिम्मेदारी, जन गण की भागिदारी" या मुख्य विषयावर शुक्रवार दि. ३ फेब्रुवारी २०१७ रोजी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेड द्वारा आयोजित सायकल रॅलीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त पणे मोठयासंख्येने सहभाग नोदविला.

## दि. २३ फरवरी २०१७

## गाडेबाबा जयंती निमीत्य स्वच्छता अभियान

राष्ट्रसंत आपले संपुर्ण आयुष्य सकाळी झाडु घेवुन गाव स्वच्छ करणारे व सायंकाळी किर्तनांच्या माध्यमातुन लोकांची मने निर्मळ करणारे थोर समाजसेवक प्रबोधकार गाडगेबाबा यांच्या कार्याची लोकांना जाणीव व्हावी या उददेशाने असोसिएशन ऑफ प्रोग्रेसीव्ह एम्प्लॉईज, चंद्रपूर या संघटनेने जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर येथे गुरूवार दि. २३ फेब्रुवारी २०१७ ला आयोजित केलेल्या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मोठया प्रमाणावर उपस्थीत राहुन या कार्यक्रमास उस्फुर्त सहभाग नोदवीला या प्रसंगी स्वच्छता अभियाना बरोबरच रूग्णांना फळे वाटप करण्यात आली.

## दि. २५ फरवरी २०१७

## साहित्य संमेलन रॅली

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दी प्रित्यर्थ अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यामाने चंद्रपूर येथे शनिवार दि.२५ फेब्रुवारी २०१७ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलनात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकाचा चमू संमेलनात सहभागी झाले तसेच संमेलनातील ग्रंथदिंडी रॅलीमध्ये उपस्थिती दर्शविली.

(प्रा. कुलदीप आर. गोंड)
कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
राष्ट्रीय सेवा योजना
National Service Scheme
Sardar Patel Mahavidyalaya
Chandrapur

(डॉ. आर. पी. इंगोले)
प्राचार्य
सरदार पटेल महाविद्यालय
चंद्रपूर




आंतरराष्ट्रीय योग दिवस पर प्रशिक्षण देतांना श्री रतन पुरस्वानी



आंतरराष्ट्रीय योग दिवस पर प्रशिक्षण घेतांना राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी

4




१ जुलै २०१६ ला महाविद्यालयात वृक्षारोपण करतांना संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. रमेशपंत मामीडवार, संस्थेचे सचिव मा. श्री. प्रशांतभाऊ पोटदुखे, संस्थेचे सहसचिव मा. डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले




१५ ऑगस्ट २०१६ ला तिरंगा रॅलीत सहभाग घेतलेले राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी




दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०१६ ला स्वच्छ भारत पंधरवाडा कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना चंद्रपूर पोलीस अधिक्षक मा. संदिप दिवान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



दि. २६ नोव्हेंबर २०१६ ला संविधान दिवस पर शपथ घेतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार




दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे गावाची स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे गावाची स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी

7




दि. २४ सप्टेंबर २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रमात शपथ देतांना
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



दि. २४ सप्टेंबर २०१६ ला राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रमात शपथ घेतांना राष्ट्रीय सेवा
योजनेचे विद्यार्थी




आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळा कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतांना श्री सुनिल नागतोडे




राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबीरच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना गोंडवाना विद्यापीठाचे माजी बी.सी.यु.डी. डॉयरेक्टर डॉ. श्रीराम रोकडे




राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबीरच्या समारोपीय कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना महाविद्यालयाचे रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी सोबत शिबिरार्थी



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराचे शिबिरार्थ्यांनसह कार्यक्रम अधिकारी




दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर संपूर्ण बंधारा बांधल्यानंतर विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिरातील शिबिरार्थ्यांनसह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले, सरपंच सौ. रीताताई जिलटे



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिराचे शिबिरार्थ्यांना मदत करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



दि. ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०१७ ला ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर संपूर्ण बंधारा बांधल्यानंतर विद्यापीठस्तरीय आणि महाविद्यालयीन विशेष शिबिरातील शिबिरार्थ्यांनसह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले




दि. ३ फेब्रुवारी २०१७ ला हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमीटेड द्वारा आयोजित सायकल रॅलीत सहभागी झालेले महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी




दि. २५ फेब्रुवारी २०१७ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज साहित्य संमेलनातील ग्रंथदिंडी रॅलीमध्ये सहभागी झालेले महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी

14




दि. २३ फेब्रुवारी २०१७ ला गाडगेबाबा जयंती निमीत्य स्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हा सामान्य रूग्नालयात स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले



दि. २३ फेब्रुवारी २०१७ ला गाडगेबाबा जयंती निमीत्य स्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हा सामान्य रूग्नालयात स्वच्छता करतांना महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी